Epaper
डिजिटल क्रांतीची धगधगती मशाल
MSME - MH-33 -0714843

दैनिक
# जन सम्राट टाईम्स
सत्याचे प्राईम्स
मुख्य संपादक: मुकुंदराव शामराव नंन्नवरे

।सोमवार, दि. १३ एप्रिल २०२६ । वर्ष १ ।अंक ६ ।पाने २।
DIGITAL EDITION




चेन्नईचा दिल्लीवर २३ धावांनी विजय

(पान २ वर)

» Selected

## कर्नाटक राजकारणात मोठा भूकंप?

नवी दिल्ली : गेल्या काही महिन्यांपासून कर्नाटकात मोठ्या राजकीय घडामोडी पाहायला मिळत आहेत. मुख्यमंत्री पदावरून काँग्रेसमधील वाद काही दिवसांपूर्वी चव्हाट्यावर आला होता. कर्नाटक सरकारमधील काही आमदारांनी नवी दिल्लीत जाऊन काँग्रेसच्या हायकमांडची भेट घेतली होती आणि उपमुख्यमंत्री डी.के. शिवकुमार यांना मुख्यमंत्री करण्याची मागणी करण्यात आल्याचं बोललं जात होतं. मात्र, काँग्रेस हायकमांडने या चर्चा फेटाळून लावल्या होत्या. त्यानंतर आता पुन्हा एकदा कर्नाटकात राजकीय घडामोडींना वेग आला आहे. कर्नाटक सरकारमधील जवळपास ३० काँग्रेस आमदार बंडाच्या तयारीत असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे. ३० आमदार एकत्र मिळून तातडीने दिल्लीला रवाना झाल्याची सांगितली जात आहे. हे ३० आमदार एकत्र मिळून काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे आणि राहुल गांधी यांची भेट घेण्याची शक्यता आहे. या संदर्भातील वृत्त एएनआयने दिलं आहे.

### ‘मित्रपक्षांची शिकार’ वक्तव्यावरून राजकीय वातावरण तापले

# आमची काळजी करू नका!

## श्रीकांत शिंदे यांचा रोहित पवार यांना टोला

जन सम्राट टाईम्स



नवी दिल्ली : भाजप आणि मित्रपक्षांबाबत सूचक इशारा देत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाचे आमदार रोहित पवार यांनी केलेल्या वक्तव्यावर शिवसेना खासदार श्रीकांत शिंदे यांनी जोरदार प्रत्युत्तर देत टोला लगावला आहे. “त्यांनी त्यांच्या पक्षाचा विचार करावा, आमच्याबद्दल काळजी करण्याची गरज नाही,” असे स्पष्ट शब्दांत शिंदेंनी सांगितले. पुण्यात माध्यमांशी संवाद साधताना शिंदे यांनी विरोधकांच्या टीकेला थेट उत्तर दिले.

रोहित पवार यांनी सोशल मीडियावर पोस्ट करत भाजप भविष्यात मित्रपक्षांची ‘शिकार’ करेल, असा दावा केला होता. या विधानामुळे राज्याच्या राजकारणात चर्चांना उधाण आले होते. या पार्श्वभूमीवर शिंदे म्हणाले, “प्रत्येक पक्ष आपली ताकद वाढवण्यासाठी काम करत असतो.

आम्हीही संघटन बळकट करण्यावर भर देत आहोत. बैठका घेऊन कार्यकर्त्यांशी संवाद साधत आहोत.” त्यांनी स्पष्ट केले की, शिवसेनेत संघटन मजबूत करण्यासाठी नियोजनबद्ध पद्धतीने काम सुरू आहे. रोहित पवार यांच्या विधानावर भाष्य करताना शिंदे यांनी विरोधकांना आपल्या पक्षातील घडामोडींवर लक्ष देण्याचा सल्ला दिला. “आमच्याबाबत चिंता करण्यापेक्षा त्यांनी त्यांच्या पक्षात काय सुरू आहे ते पाहावे,” असा टोला त्यांनी लगावला. दरम्यान, पुढील काही वर्षांत कोणत्याही मोठ्या निवडणुका नसल्याने हा काळ संघटन विस्तारासाठी महत्त्वाचा असल्याचे शिंदे यांनी नमूद केले. “वॉर्डनिहाय बैठका घेऊन कार्यकर्त्यांपर्यंत पोहोचणार आहोत. मतदार निसटू नयेत यासाठी नियोजनबद्ध पद्धतीने काम केले जाईल,” असे त्यांनी सांगितले. तसेच ‘ऑपरेशन टायगर’च्या चर्चांवर बोलताना एकनाथ शिंदे यांनी या सर्व बातम्या फेटाळून लावत, “काही चॅनल्सच या चर्चा रंगवत आहेत. शिवसेनाप्रमुख बाल ठाकरे आणि धर्मवीर आनंद दिघे यांच्या विचारांमुळेच दररोज अनेक कार्यकर्ते शिवसेनेत येत आहेत,” असे स्पष्ट केले. एकूणच, रोहित पवार यांच्या वक्तव्यावरून सुरू झालेल्या वादाला शिंदे यांच्या प्रत्युत्तराने नवे वळण मिळाले असून, पंढरपूरातील पक्षप्रवेशामुळे राज्यातील राजकीय घडामोडींना अधिक वेग आला आहे.

### पंढरपुरात राजकीय उलटफेर

दरम्यान, पंढरपूरच्या राजकारणात मोठा उलटफेर पाहायला मिळाला असून भगिरथ भालके यांनी शिवसेनेत प्रवेश केला आहे. या प्रवेशाबाबत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सोशल मीडियावर प्रतिक्रिया देत स्वागत केले. “जशी भगीरथाने गंगा पृथ्वीवर आणली, तसेच भगीरथ भालके पंढरपूरात विकासाची गंगा आणतील. त्यांच्या प्रवेशामुळे पंढरपूर, मंगळवेढा आणि माढा परिसरात शिवसेनेची ताकद वाढेल,” असा विश्वास शिंदे यांनी व्यक्त केला.

जन सम्राट टाईम्स विशेष बातमी ज

## सरकारी कर्मचाऱ्यांचा बेमुदत संपाचा इशारा

### पेन्शनची अंमलबजावणी रखडल्याने संताप




जन सम्राट टाईम्स

सातारा : राज्यातील सरकारी, निमसरकारी कर्मचारी, मुख्याध्यापक व शिक्षक संघटनांच्या समन्वय समितीने २१ एप्रिलपासून बेमुदत संपाचा इशारा दिला आहे. २० सप्टेंबर २०२४ च्या शासन निर्णयाची अंमलबजावणी अद्याप झालेली नसल्याने कर्मचाऱ्यांमध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली आहे. समन्वय समितीचे निमंत्रक रावसाहेब निमसे आणि कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष सुभाष तळेकर यांनी संप यशस्वी करण्याचे आवाहन करत तालुकानिहाय जनजागृती दौरे सुरू केल्याची माहिती दिली. समितीच्या म्हणण्यानुसार, शासनाने पूर्वीच्या आंदोलनांनंतर जुन्या पेन्शनसदृश आर्थिक व सामाजिक सुरक्षा देण्याचे धोरण तत्त्वतः मान्य केले होते. यासाठी समिती स्थापन करून शिफारशीही स्वीकारण्यात आल्या होत्या. मात्र, सुधारित राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना लागू करण्याचा निर्णय झाल्यानंतरही त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी झालेली नाही. परिणामी, १ मार्च २०२४ पासून सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांना पेन्शन मिळत नसल्याने त्यांना आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत आहे. सध्या एनपीएस, आरएनपीएस आणि केंद्र सरकारची यूपीएस योजना यांवर चर्चा सुरू आहे. मात्र, एनपीएस योजना अपुरी असल्याचे मत व्यक्त करत अनेक कर्मचाऱ्यांनी यूपीएस योजना नाकारल्याचे समितीने सांगितले. आरएनपीएस योजना अधिक सुरक्षित असल्याचा दावा करत ती तातडीने लागू करण्याची मागणी करण्यात आली आहे.गेल्या १५ महिन्यांत सात वेळा आंदोलन करूनही शासनाकडून ठोस निर्णय न झाल्याने आता बेमुदत संपाचा मार्ग स्वीकारावा लागत असल्याचे समितीने स्पष्ट केले. मुख्यमंत्री स्तरावर नियमित संवाद यंत्रणा निर्माण करून कर्मचाऱ्यांचे प्रश्न तात्काळ सोडवावेत, अशी मागणीही करण्यात आली आहे.

### २१ एप्रिलपासूनचा संप तीव्र करण्यात येईल


या संपाच्या माध्यमातून टीईटी परीक्षा व सेवांतर्गत प्रगती योजना अंमलबजावणी, २००५ पूर्वीच्या शिक्षकांना जुनी पेन्शन, नगरपालिका व नगरपरिषद आकृतीबंध, चतुर्थश्रेणी व वाहनचालक भरती, लिपिक वर्ग पदोन्नती, आरोग्य विमा योजना, निवृत्ती वय ६० वर्षे करणे, तसेच कंत्राटी कर्मचाऱ्यांचे नियमितीकरण या प्रमुख मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधले जाणार आहे. समितीने इशारा दिला आहे की, शासनाने तात्काळ सकारात्मक निर्णय घेतला नाही, तर २१ एप्रिलपासूनचा संप अधिक तीव्र करण्यात येईल. त्यामुळे राज्यातील प्रशासनावर याचा मोठा परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

## जळगावातील गोतस्करी प्रकरणाची मंत्रालयाकडून दखल; स्थानिक स्तरावर प्रतिसादाची प्रतीक्षा!

### माळी यांच्या निवेदनानंतर गृह विभागाकडे प्रकरण वर्ग

जन सम्राट टाईम्स

पाळधी (ता. धरणगाव) जळगाव जिल्ह्यातील पाळधी येथे उघडकीस आलेल्या गोतस्करी प्रकरणानंतर राज्य स्तरावर हालचाली सुरू झाल्याचे दिसून येत आहे. सामाजिक कार्यकर्ता किरण आनंदा माळी यांनी सादर केलेल्या निवेदनाची दखल घेत मा. मुख्यमंत्री सचिवालयाने सदर प्रकरण गृह विभाग तसेच पशुसंवर्धन व दुग्धविकास विभागाकडे पुढील कार्यवाहीसाठी वर्ग केले आहे. ८ एप्रिल रोजी पाळधी येथे पोलिसांनी गोवंश जनावरांची सुटका केली होती. संबंधित कारवाईचे स्वागत होत असताना, अशा घटना वारंवार का घडतात, याबाबत प्रश्न उपस्थित होत आहेत. महाराष्ट्र प्राणी संरक्षण कायदा, १९७६ (सुधारित २०१५) अंतर्गत गोवंश कत्तल व अवैध वाहतुकीवर बंदी असतानाही अशा घटना घडत असल्याने प्रभावी अंमलबजावणीची गरज अधोरेखित होत आहे. किरण माळी यांनी जिल्हाधिकारी व मुख्यमंत्री कार्यालयाला ई-मेलद्वारे सादर केलेल्या निवेदनात गोतस्करी रोखण्यासाठी जिल्हास्तरावर विशेष पथक स्थापन करणे, संवेदनशील भागात नियमित गस्त वाढवणे तसेच चेकपोस्टद्वारे वाहन तपासणी कडक करण्याची मागणी



केली आहे. दरम्यान, मुख्यमंत्री सचिवालयाकडून प्राप्त पत्रानुसार सदर प्रकरणावर आवश्यक त्या प्रतिबंधात्मक उपाययोजना व कारवाई करण्यासाठी संबंधित विभागांना निर्देश देण्यात आले आहेत. त्यामुळे या प्रकरणावर आता वरिष्ठ स्तरावर लक्ष ठेवले जात असल्याचे स्पष्ट झाले आहे.

### पाठपुरावा सोडणार नाही: किरण माळी

मंत्रालयाकडून दाद मिळाल्यामुळे या लढ्याला बळ मिळाले आहे. “स्थानिक प्रशासन केवळ घटनेनंतर कारवाई करते; मात्र, घटना घडू नयेत यासाठी प्रतिबंधात्मक उपाय करत नाही. मुख्यमंत्री कार्यालयाने दिलेल्या निर्देशांचे स्थानिक स्तरावर काय झाले, याचा आम्ही माहिती अधिकारांतर्गत पाठपुरावा करणार आहोत,” असा इशारा किरण आनंदा माळी यांनी दिला आहे.

## मुख्यमंत्री सहाय्यता निधीकडून सहाय्य मिळविणे अधिक सुलभ


जन सम्राट टाईम्स

मुंबई: नवीन ऑनलाईन प्रणालीमुळे मुख्यमंत्री सहाय्यता निधीकडून गरजू आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील रुग्णांना उपचारासाठी आर्थिक सहाय्य मिळण्याची प्रक्रिया अधिक सुलभ आणि वेगवान होणार आहे. यात रूग्णाऐवजी परस्पर रूग्णालयाकडून आर्थिक सहाय्यासाठी अर्ज सादर होणार असल्याने रूग्ण आणि त्यांच्या नातेवाईकांची होणारी परवड थांबणार आहे. मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाची ऑनलाईन प्रणाली अद्ययावत करण्यात येत आहे. यामुळे अर्ज मंजुरीची प्रक्रिया आठ तासांत पूर्ण होईल. विशेष म्हणजे रुग्णाऐवजी थेट कक्षाशी संलग्न असणाऱ्या रुग्णालयामार्फत अर्ज सादर होणार आहेत. त्यामुळे रुग्णाला कोणत्याही प्रकारचा अर्ज भरावा लागणार नाही. त्यामुळे उपचार प्रक्रियेला गती मिळेल. या प्रणालीचे येत्या काही दिवसातच राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते उदघाटन करण्यात येणार आहे, अशी माहिती मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रूग्णालय मदत कक्षाकडून देण्यात आली. वर्षभरापासून मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षामध्ये रुग्णकेंद्री बदल करण्याचे काम सुरु आहे. रुग्णाने रुग्णालयात सर्व रीतसर कागदपत्रे दिल्यानंतर रुग्णालय प्रशासन त्याचा अर्ज मुख्यमंत्री सहायता निधी कार्यालयाकडे मंजुरीसाठी पाठवेल. नियमानुसार सर्व कागदपत्रे असल्यास अर्ज मंजुरीची प्रक्रिया कार्यालयीन आठ तासांत पूर्ण होणार आहे.

जन सम्राट टाईम्स ब्रेक न्यूज ज

## सुरांच्या स्वरगंगेतील अजरामर आवाज शांत

### आशा भोसले यांना भावपूर्ण श्रद्धांजली




जन सम्राट टाईम्स

**मुंबई** : भारतीय संगीतविश्वाला आपल्या बहुरंगी आणि अद्वितीय आवाजाने समृद्ध करणाऱ्या ज्येष्ठ गायिका आशा भोसले यांच्या निधनाने संपूर्ण देश शोकमग्न झाला आहे. त्यांच्या जाण्याने केवळ एक महान कलाकार नव्हे, तर भारतीय संगीताची एक सजीव परंपराच हरपल्याची भावना व्यक्त होत आहे. या पार्श्वभूमीवर राज्याचे पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री तथा जळगावचे पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी भावपूर्ण शब्दांत श्रद्धांजली अर्पण केली आहे.

“सुरांच्या स्वरगंगेतील एक अजरामर आवाज आज शांत झाला,” अशा शब्दांत त्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. मंत्री पाटील यांनी म्हटले की, आशाताईंचा आवाज काळाच्या पलीकडे जाणारा होता.

शास्त्रीय संगीत, भावगीत, गझल तसेच चित्रपटसंगीत अशा विविध प्रकारांमध्ये त्यांनी आपल्या गायकीची अमिट छाप उमटवली. त्यांच्या प्रत्येक गीतामध्ये भावनांची अनोखी खोली असून, ती पिढ्यान्‌पिढ्या रसिकांच्या मनात घर करून राहिली आहे. त्यांनी पुढे नमूद केले की, महाराष्ट्राच्या सांस्कृतिक वैभवात आशा भोसले यांचे योगदान अतुलनीय आहे.

त्यांच्या सुरांनी केवळ मनोरंजनच नाही, तर संस्कृती आणि परंपरेचे संवर्धन केले. त्यांच्या कार्यातून येणाऱ्या पिढ्यांना प्रेरणा मिळत राहील, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

### विनम्र अभिवादन

या दुःखद प्रसंगी मंत्री पाटील यांनी आशा भोसले यांना विनम्र अभिवादन करत त्यांच्या कुटुंबीयांच्या दुःखात सहभागी असल्याचे सांगितले. भारतीय संगीतविश्वातील हे अपूरणीय नुकसान असून, आशा भोसले यांच्या सुरांची जादू मात्र कायम रसिकांच्या हृदयात जिवंत राहणार आहे.

## नाशिक प्रकरणातील माहिती तंत्रज्ञान कंपनीचा दणका!


जन सम्राट टाईम्स

पुणे : माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील आघाडीच्या कंपनीच्या नाशिकमधील कार्यालयातील अनेक धक्कादायक गोष्टी समोर येत आहेत. असे असताना माहिती तंत्रज्ञान कंपनीने या प्रकरणी खुलासा करीत संबंधित कर्मचाऱ्यांवर कारवाई केल्याचे जाहीर केले आहे. या प्रकरणाच्या चौकशीत तपास यंत्रणांना सर्वतोपरी सहकार्य केले जात असल्याचेही कंपनीने स्पष्ट केले आहे. माहिती तंत्रज्ञान कंपनीने म्हटले आहे की, अत्याचार आणि इतर गैरप्रकाराचे प्रकरण कंपनी थारा देत नाही. आम्ही कर्मचाऱ्यांची सुरक्षा आणि कल्याणाला नेहमीच प्राधान्य देतो. यासाठीची उच्च मानके आम्ही स्वीकारलेली असून, त्यांचे पालन केले जाते. कर्मचाऱ्यांच्या छळाच्या घटनांना व्यवस्थापन सहन करणार नाही. नाशिकमधील प्रकरणात चौकशी सुरू असलेल्या कर्मचाऱ्यांना निलंबित करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. नाशिकमधील प्रकरणाची माहिती मिळाल्यानंतर आम्ही तातडीने ही कारवाई केली आहे.

## पाळधी येथे मध्यरात्री बकऱ्या चोरीने खळबळ

### घराचा दरवाजा बाहेरून बंद करून सात बकऱ्या लंपास

जन सम्राट टाईम्स



पाळधी (ता. धरणगाव) : पाळधी येथील म्हाडा कॉलनी परिसरात मध्यरात्री घडलेल्या बकऱ्या चोरीच्या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली आहे. घराबाहेर बांधलेल्या सात बकऱ्या अज्ञात चोरट्यांनी चोरून नेल्याची घटना समोर आली आहे.

माहितीनुसार, येथील रहिवासी नरेश सपकाळे यांनी आपल्या घरासमोर सात गावठी बकऱ्या बांधून ठेवल्या होत्या. मध्यरात्रीच्या सुमारास चोरट्यांनी त्यांच्या घराचा दरवाजा बाहेरून बंद करून नियोजनबद्ध पद्धतीने बकऱ्या चोरून नेल्या. या बकऱ्यांची अंदाजे किंमत सुमारे ३५ हजार रुपये असल्याचे सांगण्यात आले आहे. दरम्यान, बकऱ्यांच्या आवाजामुळे सपकाळे यांना जाग आली. मात्र, घराचा दरवाजा बाहेरून बंद केल्यामुळे त्यांना तत्काळ बाहेर पडता आले नाही.

तोपर्यंत चोरट्यांनी बकऱ्या घेऊन घटनास्थळावरून पळ काढला होता.

घटनेची माहिती मिळताच स्थानिक नागरिकांनी आणि पोलिसांनी रात्रीच परिसरात शोधमोहीम राबवली. मात्र, अंधाराचा फायदा घेत चोरटे पसार होण्यात यशस्वी झाले. या प्रकरणी नरेश सपकाळे यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्यांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास हेड कॉन्स्टेबल जितेश नाईक आणि योगेश सोनवणे करीत असून, पोलिसांकडून चोरट्यांचा शोध सुरू आहे. या घटनेमुळे परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, रात्रीच्या वेळी सुरक्षेच्या उपाययोजना वाढवण्याची मागणी करण्यात येत आहे.

जन सम्राट टाईम्स अँकर न्यूज ज

## महात्मा फुले जयंतीनिमित्त पाळधी येथे रक्तदान शिबिर

### ५० रक्तदात्यांचा उत्स्फूर्त सहभाग; सामाजिक बांधिलकीचा संदेश

जन सम्राट टाईम्स



पाळधी (ता. धरणगाव) : : क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्त पाळधी येथे सावता माळी मित्र मंडळाच्या वतीने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत तब्बल ५० जणांनी रक्तदान करत सामाजिक बांधिलकीचा संदेश दिला.

कार्यक्रमाच्या प्रारंभी महात्मा ज्योतिबा फुले यांच्या प्रतिमेचे पूजन माजी जिल्हा परिषद सदस्य प्रतापराव पाटील आणि उद्योजक दिलीप पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी उपस्थित मान्यवरांनी फुले यांच्या सामाजिक कार्याचा गौरव करत त्यांच्या विचारांचे स्मरण केले. रक्तदान शिबिरात माजी सरपंच चंदू पाटील यांच्यासह एकूण ४९ रक्तदात्यांनी रक्तदान केले. या उपक्रमामुळे गरजू रुग्णांना जीवनदान मिळण्यास मदत होणार असल्याचे आयोजकांनी सांगितले. या प्रसंगी धरणगाव कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती संजय पाटील, माजी सरपंच हेमंत पाटील, ग्रामपंचायत सदस्य दिगंबर पाटील, राजू पाटील, राजू महाजन, राहुल अर्जुन पाटील, पप्पू माळी यांच्यासह गावातील अनेक प्रतिष्ठित नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### उपक्रमाचे सर्वत्र कौतुक

या रक्तदान शिबिरातून समाजात परस्पर सहकार्य, मानवता आणि सामाजिक जबाबदारी यांचे महत्त्व अधोरेखित झाले. महात्मा फुले यांच्या जयंतीनिमित्त राबविण्यात आलेल्या या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

## यावलमध्ये केळी व्यापाऱ्याची साडेतीन लाखांची फसवणूक

जन सम्राट टाईम्स

यावल : दिल्ली येथे केळी पाठवून त्याचे पैसे न देता, बनावट बँक ट्रान्झॅक्शनचे स्क्रीनशॉट पाठवून एका केळी व्यापाऱ्याची ३ लाख ५७ हजार ५२१ रुपयांची फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकारणी यावल पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यावल तालुक्यातील निमगाव येथील रहिवासी आणि केळी व्यापारी ज्ञानेश्वर नामदेव महाजन (वय ५८) यांना ‘शुभम केला एजन्सी’ नावाचा वापर करणाऱ्या एका व्यक्तीने वेळोवेळी फोन केला. त्याने महाजन यांचा विश्वास संपादन करून त्यांना आपली केळी दिल्ली येथील ‘शिवनारायण भाईजी केला स्टोअर’ (पंजाबी बाग) येथे पाठवण्यास सांगितले.दोन ट्रक भरून पाठवली केळ व्यापाऱ्याच्या सांगण्यावरून फिर्यादी महाजन यांनी २३ मार्च ते २६ मार्च २०२६ दरम्यान दोन ट्रकद्वारे केळी पाठवली. आयशर ट्रक (RJ.11. GD.3736): १,६२,५०० रुपये किमतीची १५८.५० क्विंटल केळी व ट्रॉला ट्रक (RJ.11.GD.3847): १,९५,०२१ रुपये किमतीची १६४.२० क्विंटल केळी अशी पाठवली आहे. आरोपीने सदर माल दिलेल्या पत्त्यावर खाली न करता तो दुसऱ्याच ठिकाणी वळवला. जेव्हा फिर्यादीने पैशांची मागणी केली, तेव्हा आरोपीने ‘फिनो पेमेंट ॲप्लिकेशन’द्वारे बनावट ट्रान्झॅक्शन तयार केले. ‘एसबीआय’ बँकेच्या मशीनमध्ये चेक टाकल्याचे भासवून त्याचे खोटे स्क्रीनशॉट महाजन यांना व्हॉट्सॲपवर पाठवले. प्रत्यक्षात महाजन यांच्या खात्यात कोणतीही रक्कम जमा झाली नाही.

Selected

### सोलापूरच्या तापमानात पुन्हा वाढ

मुंबई : पंढरपूर : सोलापूर शहराच्या तापमानात पुन्हा वाढ झाली आहे. सोलापूरचा पारा ४१.६ अंश सेल्सियस इतके नोंद झाले आहे. त्यामुळे उन्हाचे चटके आता खऱ्या अर्थाने सोसावे लागणार आहेत. ११ एप्रिलच्या तुलनेत १२ एप्रिल रोजी तापमानात तब्बल ०.२ अंशांची लक्षणीय वाढ नोंदवण्यात आली आहे. यामुळे शहरात दुपारच्या वेळी शहरात जणू 'अघोषित संचारबंदी' असल्यासारखा शुकशुकाट पाहायला मिळत आहे. कमाल तापमान ४१.६ अं. सेल्सियस तर किमान तापमान २६.६ अंश सेल्सियस नोंद झाली आहे. कोरडे हवामान आणि कडक उन्हामुळे अंगाची लाहीलाही होत आहे. हवेतील आर्द्रता घटल्याने उन्हाचा चटका अधिक तीव्र जाणवत आहे. हवामान खात्याच्या अंदाजानुसार, एप्रिलचा मध्य जवळ येत असताना सूर्याची प्रखरता आणखी वाढणार आहे. १० मार्च रोजी तापमानात मोठी वाढ झाल्यानंतर मध्यंतरी काही दिवस किंचित दिलासा मिळाला होता. मात्र, रविवारचे तापमान ४१.६ अंशांच्या नोंदीने पुन्हा एकदा उन्हाचा त्रास वाढला आहे.

# महात्मा फुलेंचे कार्य समाजाला स्फूर्ती देणारे : पालकमंत्री गुलाबराव पाटील

## पाळधी येथे जयंती उत्साहात; अभिवादन कार्यक्रमात नागरिकांचा उत्स्फूर्त सहभाग

जन सम्राट टाईम्स

**जळगाव :** समाजातील उपेक्षित, शोषित घटकांना न्याय व हक्क मिळवून देण्यासाठी समाजसुधारक क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिराव फुले यांनी आपले संपूर्ण आयुष्य समर्पित केले. त्यांनी उभा केलेला सामाजिक न्यायाचा लढा म्हणजेच मानवतेच्या इतिहासातील क्रांतीची पहाट ठरली, असे प्रतिपादन पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री तथा पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी केले. पाळधी येथे महात्मा फुले जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात ते मार्गदर्शन करताना बोलत होते. यावेळी गावात मोठ्या उत्साहात जयंती साजरी करण्यात आली. पालकमंत्री गुलाबराव पाटील यांच्या हस्ते महात्मा फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. यावेळी त्यांनी पुढे सांगितले की,



महात्मा फुले यांनी शिक्षण, स्त्री-स्वातंत्र्य, जातिव्यवस्थेविरुद्ध लढा आणि सामाजिक समतेसाठी केलेले कार्य आजही प्रेरणादायी आहे. त्यांनी सुरू केलेल्या विचारप्रवाहामुळे समाजातील दुर्बल घटकांना नवे आयुष्य मिळाले. त्यामुळे त्यांच्या विचारांचे अनुसरण करणे हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल.



### यांची होती विशेष उपस्थिती

कार्यक्रमाला धरणगाव पंचायत समितीचे माजी सभापती मुकुंदराव नन्नवरे, उद्योजक दिलीप बापू पाटील, उद्योजक अनिल कासट, सरपंच विजय पाटील, माळी महासंघाचे जिल्हाध्यक्ष अनिल माळी, शेतकी संघाचे संचालक संजीव महाजन, आबा महाजन यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. यावेळी उपस्थितांनी महात्मा फुले यांच्या कार्याचे स्मरण करून त्यांच्या विचारांवर चालण्याचा निर्धार व्यक्त केला. कार्यक्रम उत्साहपूर्ण व शिस्तबद्ध वातावरणात पार पडला.

जयंतीनिमित्त पाळधी खुर्द व पाळधी बुद्रुक या गावांमध्ये भव्य मिरवणूक काढण्यात आली. या मिरवणुकीत विविध समाजघटकांनी सहभाग घेत महात्मा फुले यांच्या विचारांचा जागर केला. ढोल-ताशांच्या गजरात आणि घोषणाबाजीत संपूर्ण परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते.

जन सम्राट टाईम्स — विशेष बातमी

# पाळधी स्थानकावर 'माणुसकीचा जलसिंचन'

## प्रवाशांसाठी प्रतापराव पाटील यांची धाव

जन सम्राट टाईम्स

**पाळधी :** पाळधी रेल्वे स्थानकावर उधना ते हसनपूर ही प्रवासी रेल्वे तब्बल तीन तासांहून अधिक काळ उभी राहिल्याने प्रवाशांची मोठी गैरसोय झाली. सकाळी सुमारे ११ वाजल्यापासून रेल्वे मार्ग मोकळा नसल्यामुळे गाडी स्थानकावरच थांबून राहिली होती. या अनपेक्षित विलंबामुळे प्रवाशांना प्रचंड त्रास सहन करावा लागला. एप्रिलच्या कडाक्याच्या उन्हात लहान मुले, महिला आणि ज्येष्ठ नागरिक अक्षरशः होरपळून निघत होते. अनेक प्रवाशांकडे पिण्याच्या पाण्याची कोणतीही सोय नव्हती. स्थानकावरही पाणी व इतर मूलभूत सुविधांची कमतरता जाणवत असल्याने परिस्थिती अधिकच गंभीर झाली होती. तहान, उष्मा आणि प्रतीक्षेच्या त्रासामुळे प्रवाशांची अवस्था बिकट बनली होती. या गंभीर परिस्थितीची माहिती मिळताच माजी जिल्हा परिषद सदस्य प्रतापराव पाटील यांनी तातडीने पुढाकार घेत मदतीचा हात पुढे केला. कोणतीही विलंब न लावता त्यांनी सुमारे २५० पाण्याचे जार उपलब्ध करून दिले. काही वेळातच स्थानकावर पाण्याचे वाटप सुरू करण्यात आले आणि तहानलेल्या प्रवाशांना मोठा दिलासा मिळाला. या मदतकार्यात जीपीएस मित्र परिवारानेही मोलाची भूमिका बजावली. त्यांनी पाण्याचे जार



व्यवस्थित पद्धतीने प्रवाशांपर्यंत पोहोचवण्याचे काम हाती घेतले. शिस्तबद्ध नियोजनामुळे कोणत्याही प्रवाशाला अडचण येऊ नये याची विशेष काळजी घेण्यात आली. या प्रसंगी अनेक प्रवाशांनी प्रतापराव पाटील यांच्या या मानवतावादी कार्याचे मनापासून कौतुक करत कृतज्ञता व्यक्त केली. "अशा कठीण प्रसंगी मदतीला धावून येणारे लोक आजही समाजात आहेत, हीच खरी माणुसकी आहे," अशा भावना प्रवाशांनी व्यक्त केल्या.

### समाजात माणुसकी अजूनही जिवंत

प्रतापराव पाटील यांच्या या कृतीतून त्यांची लोकांप्रती असलेली संवेदनशीलता आणि सामाजिक बांधिलकी अधोरेखित झाली आहे. संकटाच्या वेळी तत्काळ प्रतिसाद देत लोकांच्या मूलभूत गरजा पूर्ण करण्याची जबाबदारी त्यांनी प्रभावीपणे पार पाडली. पाळधी स्थानकावर घडलेली ही घटना केवळ मदतकार्यापुरती मर्यादित न राहता, समाजात माणुसकी अजूनही जिवंत असल्याचा सकारात्मक संदेश देणारी ठरली आहे.

# वंचित उद्योजकांसाठी नवी दिशा; 'नेक्स्ट जनरेशन चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्री'चा मुंबईत भव्य शुभारंभ

जन सम्राट टाईम्स

मुंबई: बहुजन, ग्रामीण आणि वंचित समाजातील उद्योजकांना मुख्य प्रवाहात आणण्याच्या उद्देशाने 'नेक्स्ट जनरेशन चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्री' (NCCI) या नव्या व्यासपीठाचा मुंबईत भव्य शुभारंभ करण्यात आला. महात्मा जोतीराव फुले यांच्या जयंतीचे औचित्य साधत वांद्रे-कुर्ला संकुलातील वॉकहार्ट टॉवर्स येथे हा सोहळा उत्साहात पार पडला. उद्योग, बँकिंग, प्रशासन आणि सामाजिक क्षेत्रातील मान्यवरांची यावेळी मोठी उपस्थिती होती. संस्थापक प्रवीण मोरे आणि सहसंस्थापिका शितल बोराडे यांच्या पुढाकारातून स्थापन झालेल्या या चेंबरने सुरुवातीलाच स्पष्ट संदेश दिला—आर्थिक संधी केवळ काही मोजक्या लोकांपुरत्या मर्यादित न राहता समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचल्या पाहिजेत. उद्घाटनप्रसंगी बोलताना मोरे यांनी सांगितले की, अनुसूचित जाती-जमाती, इतर मागासवर्गीय आणि ग्रामीण भागातील उद्योजकांना भांडवल, बाजारपेठ आणि संस्थात्मक पाठबळापासून वंचित ठेवण्यात आले आहे. ही दरी मिटविणे हेच NCCI चे मुख्य ध्येय आहे. कार्यक्रमात उद्योग आणि बँकिंग क्षेत्राकडूनही सकारात्मक प्रतिसाद मिळाला. वॉकहार्ट ग्रुपचे अध्यक्ष व मुख्य कार्यकारी अधिकारी हुझैफा खोराकीवाला यांनी संस्थेला पूर्ण पाठिंबा देण्याची घोषणा केली. निवृत्त सनदी अधिकारी डॉ. संजय चहांदे यांनी उद्योजकतेसाठी ज्ञान, कौशल्य आणि भांडवल यांची सांगड आवश्यक असल्याचे अधोरेखित केले. पात्र उद्योजकांना व्हेंचर कॅपिटलच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात आर्थिक सहाय्य मिळू शकते, अशी माहिती त्यांनी दिली. मंत्रालयातील अवर सचिव विशाखा आढाव यांनी शासनस्तरावरून आवश्यक सहकार्याची हमी देत, महात्मा फुले यांच्या समतेच्या विचारांना पुढे नेण्याचे महत्त्व अधोरेखित केले. कॅनरा बँक आणि पंजाब नॅशनल बँकेच्या प्रतिनिधींनी कर्जप्रक्रिया व विविध योजनांबाबत मार्गदर्शन केले.

जन सम्राट टाईम्स — ब्रेक न्यूज

# महिला व बालकल्याण विभागात मेगा भरती

## २.३३ लाख पदांना प्रशासकीय मान्यता

जन सम्राट टाईम्स

**मुंबई:** राज्यातील महिला व बालकल्याण विभागात मोठ्या प्रमाणावर भरतीचा मार्ग मोकळा झाला असून तब्बल २,३३,००५ पदांना प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. तब्बल २३ वर्षांनंतर विभागाच्या रचनेत मोठा बदल करण्यात आल्याने विभागाचे सक्षमीकरण होणार असून, यामुळे शासकीय योजनांची अंमलबजावणी अधिक प्रभावीपणे होईल, असा विश्वास मंत्री आदिती तटकरे यांनी व्यक्त केला आहे. ११ मार्च २०२६ रोजी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत महिला व बाल विकास विभागाच्या क्षेत्रीय कार्यालयांच्या सुधारित आकृतीबंधास मंजुरी देण्यात आली होतीहा निर्णय ऐतिहासिक ठरणार असल्याचे मत व्यक्त केले जात आहे. या निर्णयाअंतर्गत विविध स्तरांवरील पदांना मान्यता देण्यात आली आहे. गट-अ ते गट-डमधील एकूण ८६६९ नियमित पदे, २८४३ बाह्यस्त्रोत पदे तसेच १,१०,६६४ अंगणवाडी सेविका आणि तितक्याच म्हणजे १,१०,६६४ अंगणवाडी मदतनीस पदांचा समावेश असलेल्या एकूण २,२१,३२८ मानधनी पदांना मान्यता देण्यात आली आहे. याशिवाय बदलत्या गरजांचा विचार करून उच्चस्तरीय समितीने प्रस्तावित केलेल्या १६५ नवीन पदांनाही मंजुरी देण्यात आली आहे.तसेच, महाराष्ट्र समाज कल्याण बोर्ड येथील १५ कार्यरत व ३२ प्रतिनियुक्तीवरील कर्मचाऱ्यांचे समायोजन आयुक्त, महिला व बाल विकास, पुणे यांच्या अधिनस्त रिक्त पदांवर समकक्ष वेतनात करण्यात येणार आहे.



### योजनांची अंमलबजावणी


या सर्व निर्णयामुळे विभागाच्या कामकाजाला गती मिळणार असून ग्रामीण व शहरी भागातील महिला आणि बालकांसाठी राबविण्यात येणाऱ्या विविध शासकीय योजनांची अंमलबजावणी अधिक परिणामकारक होणार आहे. आरोग्य आणि शिक्षणाशी संबंधित योजनांना बळकटी मिळणार आहे. दरम्यान, २००३ पासून प्रलंबित असलेला हा विषय मार्गी लागल्याने प्रशासनातील अडथळे दूर होणार असून सेवा वितरण अधिक कार्यक्षम होईल.

# श्रेयस–प्रियांशच्या आक्रमणाने पंजाबची ६ गडी राखून हैदराबादवर दमदार मात

## अभिषेक शर्माने अवघ्या २८ चेंडूत ७४ धावांची तुफानी खेळी केली

जन सम्राट टाईम्स

मुंबई (गुरुदत्त वाकदेकर) आयपीएल २०२६ मधील १७व्या सामन्यात पंजाब किंग्जने सनरायझर्स हैदराबादवर ६ गडी राखून दणदणीत विजय मिळवत स्पर्धेतील आपले आव्हान अधिक भक्कम केले. महाराजा यादविंद्रसिंह आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियम, न्यू चंदीगड येथे झालेल्या या धावांचा पाऊस पाडणाऱ्या सामन्यात हैदराबादने प्रथम फलंदाजी करत २० षटकांत २१९/६ धावा उभारल्या. प्रत्युत्तरात पंजाबने १८.५ षटकांत २२३/४ धावा करत ७ चेंडू राखून लक्ष्य गाठले. श्रेयस अय्यर आणि प्रियांश आर्य यांच्या निर्णायक भागीदारीने सामन्याचा चेहरामोहरा पूर्णपणे बदलून टाकला. हैदराबादची सुरुवात वादळी झाली. अभिषेक शर्माने अवघ्या २८ चेंडूत ७४ धावांची तुफानी खेळी साकारत पॉवरप्लेमध्येच पंजाबवर दबाव निर्माण केला. ट्रॅव्हिस हेडने २३ चेंडूत ३८ धावा करत त्याला उत्तम साथ दिली. दोघांनी पहिल्या विकेटसाठी केवळ ३६ चेंडूत १०० धावांची भागीदारी उभारत सामन्याला स्फोटक सुरुवात दिली. पॉवरप्लेमध्ये १०५/० ही नोंद या हंगामातील सर्वात वेगवान सुरुवातींपैकी एक ठरली. शेवटच्या टप्प्यात हेन्रिक क्लासेनने संयमी धावा जोडत संघाला २१९ पर्यंत पोहोचवले. पंजाबकडून शशांक सिंगने अनपेक्षित पण प्रभावी गोलंदाजी करत ३ षटकांत २० धावांत २ बळी घेत सामन्याचा पहिला टर्निंग पॉइंट घडवला. पॉवरप्लेनंतर त्याने अभिषेक आणि हेड या दोघांना बाद करत हैदराबादच्या धावगतीला अचानक ब्रेक लावला. पहिल्या ६ षटकांत १०५ धावा करणाऱ्या हैदराबादला पुढील १४ षटकांत केवळ ११४ धावांवर रोखणे हे पंजाबच्या गोलंदाजीचे सर्वात मोठे यश ठरले. २२० धावांच्या विशाल आव्हानाचा पाठलाग करताना पंजाबची सुरुवात




तितकीच आक्रमक झाली. प्रियांश आर्याने अवघ्या २० चेंडूत ५७ धावांची झंझावाती खेळी करत लक्ष्याचा दबाव पूर्णपणे कमी केला. दुसऱ्या टोकाला कर्णधार श्रेयस अय्यरने ३३ चेंडूत ६९ धावांची नाबाद कर्णधार खेळी साकारत शेवटपर्यंत डाव सांभाळला. प्रियांश–श्रेयस यांची वेगवान भागीदारी हा विजयाचा खरा पाया ठरली. दोघांनी मधल्या षटकांत फिरकी आणि वेगवान गोलंदाजांवर अचूक हल्ला चढवत आवश्यक धावगती पूर्णपणे पंजाबच्या बाजूला ठेवली. सामन्याचा खरा टर्निंग पॉइंट १५व्या षटकात दिसला. त्या षटकात श्रेयस अय्यरने सलग मोठे फटके खेचत समीकरण पूर्णपणे पंजाबच्या नियंत्रणात आणले. अखेरच्या ५ षटकांत पंजाबने ६४ धावा फटकावत हैदराबादच्या डेथ बॉलिंगची पूर्णपणे पोलखोल केली. त्यानंतर शशांक सिंगने शेवटच्या टप्प्यात शांत आणि परिपक्व फलंदाजी करत विजयावर शिक्कामोर्तब केले. १८.५ षटकांत २२३ धावांचा यशस्वी पाठलाग हा या हंगामातील सर्वात प्रभावी चेसपैकी एक ठरला. हैदराबादकडून शिवांग कुमारने ३ बळी घेत प्रतिकार करण्याचा प्रयत्न केला. हर्ष दुबेने मधल्या षटकांत एक महत्त्वाचा बळी घेत पंजाबला रोखण्याचा प्रयत्न केला. मात्र श्रेयस–प्रियांशसमोर गोलंदाजीचा प्रभाव कमी पडला. डेथ ओव्हर्सपूर्वीच पंजाबने विजय मिळवत आपल्या फलंदाजीची खोली दाखवून दिली. या सामन्यात अनेक महत्त्वाचे विक्रम नोंदले गेले.

# जेवायला थांबलेल्या प्रवाशाची गाडी फोडून १ लाखांची रोकड लंपास

जन सम्राट टाईम्स

शिरूर (पुणे) : पुणे जिल्ह्यातील शिरूर तालुक्यातील पाबळ गावात जेवणासाठी थांबलेल्या प्रवाशाच्या चारचाकी वाहनाची काच फोडून सुमारे एक लाख रुपयांची रोकड लंपास केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली असून, प्रवाशांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित प्रवासी जेवणासाठी थांबलेला असताना अज्ञात चोरट्याने संधी साधत वाहनावर डल्ला मारला. आरोपीने वाहनाची काच फोडून आत ठेवलेली रोकड चोरून नेली आणि क्षणार्धात घटनास्थळावरून फरार झाला. विशेष म्हणजे, ही संपूर्ण घटना परिसरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाली आहे. फुटेजमध्ये संशयित व्यक्ती चोरी करण्यापूर्वी वाहनाभोवती संशयास्पद हालचाली करताना दिसत आहे. त्यामुळे आरोपीने आधीच रेकी करून ही चोरी केली असावी, असा अंदाज व्यक्त केला जात आहे. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला. सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे आरोपीचा शोध घेण्याचे काम सुरू करण्यात आले आहे. संबंधित पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, लवकरच आरोपीला अटक करण्यात येईल, असा विश्वास पोलिसांनी व्यक्त केला आहे. दरम्यान, या घटनेच्या पार्श्वभूमीवर पोलिसांनी नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे. वाहनात मोठ्या प्रमाणात रोकड किंवा मौल्यवान वस्तू न ठेवण्याचा सल्ला देण्यात आला आहे. पाबळ परिसरातील ही घटना प्रवाशांसाठी धोक्याची घंटा ठरत असून, वाहन सुरक्षिततेबाबत अधिक खबरदारी घेण्याची गरज अधोरेखित झाली आहे.

# सॅमसनचा शतकी झंझावात, चेन्नईचा दिल्लीवर २३ धावांनी विजय

जन सम्राट टाईम्स

मुंबई (गुरुदत्त वाकदेकर) : आयपीएल २०२६ मधील १८व्या सामन्यात चेन्नई सुपर किंग्जने दिल्ली कॅपिटल्सवर २३ धावांनी प्रभावी विजय मिळवत हंगामातील पुनरागमनाला भक्कम दिशा दिली. एम. ए. चिदंबरम स्टेडियम, चेपॉक, चेन्नई येथे झालेल्या या उच्च दर्जाच्या लढतीत चेन्नईने २० षटकांत २१२/२ धावांचा भक्कम डोंगर उभा केला. प्रत्युत्तरात दिल्लीचा डाव २० षटकांत १८९ धावांवर आटोपला. संजू सॅमसनच्या शतकी झंझावाताने आणि जेमी ओव्हरटनच्या अचूक गोलंदाजीने सामन्याचा चेहरामोहरा पूर्णपणे बदलून टाकला. चेन्नईची सुरुवात आत्मविश्वासपूर्ण झाली. संजू सॅमसनने पहिल्याच षटकापासून आक्रमक सूर लावत दिल्लीच्या गोलंदाजांवर दबाव निर्माण केला. त्याने अवघ्या ५६ चेंडूत ११५ नाबाद धावांची वादळी खेळी साकारली. चौकार आणि षटकारांचा सुंदर मिलाफ त्याच्या डावात पाहायला मिळाला. दुसऱ्या टोकाला आयुष म्हात्रेने ३६ चेंडूत ५९ धावांची झंझावाती खेळी करत त्याला तितकीच भक्कम साथ दिली. सॅमसन–म्हात्रे यांची १५० पेक्षा अधिक धावांची निर्णायक भागीदारी हा चेन्नईच्या डावाचा खरा कणा ठरली. याच भागीदारीमुळे संघाने २१० पार मजल मारली. दिल्लीकडून अक्षर पटेलने मधल्या षटकांत एक महत्त्वाचा बळी घेत काहीसा ब्रेक लावण्याचा प्रयत्न केला. मात्र सामन्याचा पहिला टर्निंग पॉइंट १७व्या षटकात दिसला. त्या षटकात सॅमसनने सलग मोठे फटके खेचत धावगती अचानक वाढवली. शेवटच्या चार षटकांत चेन्नईने वेगाने धावा उभारत दिल्लीसमोर प्रचंड लक्ष्य ठेवले. याच अतिरिक्त १५ ते २० धावा अखेरीस निर्णायक ठरल्या. २१३ धावांच्या आव्हानाचा पाठलाग करताना दिल्लीची सुरुवात वेगवान झाली. केएल राहुल आणि पाथुम निस्संका यांनी पॉवरप्लेमध्ये धडाकेबाज फटकेबाजी केली. निस्संकाने २४ चेंडूत ४१ धावा केल्या. मात्र मधल्या षटकांत जेमी ओव्हरटनने सामन्याचा संपूर्ण रंग बदलला. त्याने अचूक टप्प्यावर मारा करत दिल्लीच्या मधल्या फळीला हादरे दिले. ट्रिस्टन स्टब्सने ३८ चेंडूत ६० धावा करत लढा जिवंत ठेवला, पण वाढती धावगती दिल्लीला महाग पडली. अखेरीस संपूर्ण संघ १८९ धावांवर रोखला गेला. सामन्याचा खरा टर्निंग पॉइंट १४व्या ते १६व्या षटकांत दिसला. या टप्प्यात ओव्हरटनने स्टब्ससह दोन महत्त्वाच्या विकेट्स घेत दिल्लीचा कणा मोडला. चेपॉकवर २०० पेक्षा अधिक धावा करून यशस्वी बचाव करण्याची चेन्नईची परंपरा या सामन्याने अधिक मजबूत केली.




### अंशुल कांबोजने 3 बळी घेतले

१४व्या षटकातील सलग दोन चौकारांनी दिल्लीच्या विजयाचा मार्ग जवळजवळ निश्चित झाला होता; मात्र लगेचच ओव्हरटनच्या अचूक स्पेलने संपूर्ण समीकरण उलटवले. त्या एका स्पेलमुळे आवश्यक धावगती नियंत्रणाबाहेर गेली. त्यानंतर अंशुल कांबोजनेही अचूक गोलंदाजी करत ३ बळी घेत विजयावर शिक्कामोर्तब केले. या सामन्यात अनेक महत्त्वाचे विक्रम नोंदले गेले. संजू सॅमसनचे ११५ नाबाद हे चेन्नईसाठी हंगामातील पहिले शतक ठरले. चेन्नईचा सलग पराभवाचा दुष्काळ संपुष्टात आला. जेमी ओव्हरटनचे ४/१८ हे या हंगामातील चेन्नईकडून सर्वोत्तम गोलंदाजी प्रदर्शन ठरले.

जन सम्राट टाईम्स — अँकर न्यूज

# क्रांतीसूर्य महात्मा फुले जयंती उत्साहात साजरी

## वडगाव कोल्हाटीत अभिवादन कार्यक्रम; महापुरुषांच्या विचारांनी भारवले वातावरण

जन सम्राट टाईम्स

पुणे : शहरातील वडगाव कोल्हाटी, गट नं. ११, बजाज नगर येथे क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिराव फुले आणि विश्वरत्न, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन कार्यक्रम उत्साहात पार पडला. या कार्यक्रमासाठी परिसरातील नागरिक, अनुयायी आणि महिला मोठ्या संख्येने उपस्थित राहून महापुरुषांना अभिवादन केले. कार्यक्रमात महात्मा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर



यांच्या सामाजिक कार्याचा व विचारांचा आढावा घेण्यात आला. समाजातील विषमता दूर करून शिक्षण, समता आणि न्याय यांसाठी त्यांनी दिलेल्या योगदानाचे स्मरण करण्यात आले. यावेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या "मी माझे वृक्ष हे खडका वरती लावले आहे, ज्याला फळे उशिरा येतील पण ती सकस व पौष्टिक असतील" या प्रेरणादायी विचाराचा विशेष उल्लेख करण्यात आला. कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून मा. आकाश गायकवाड व रमेश वाघमारे उपस्थित होते. त्यांनी आपल्या मनोगतातून महापुरुषांच्या विचारांचे आजच्या पिढीसाठी असलेले महत्त्व अधोरेखित केले. समाज परिवर्तनासाठी शिक्षण आणि संघटन यांची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले. या प्रसंगी परिसरातील महिलांनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेत कार्यक्रमात रंगत आणली. सामाजिक एकात्मता आणि बंधुभावाचे दर्शन घडवणारा हा कार्यक्रम ठरला. कार्यक्रमाचे सुयोग्य नियोजन गोविंद लोंढे यांनी केले. तसेच "आम्ही भारताचे लोक" या आंबेडकरी सांस्कृतिक चळवळीतील प्रतिनिधी राहुल जोगदंडे, उमेश मळीकर, विजय जाधव, अशोक चाळक, नितीन सिरसाठ, रमेश गवळी, नारायण ओवळेकर आदी मान्यवर उपस्थित होते.

### समाजात सकारात्मक बदल घडवण्याचा निर्धार

कार्यक्रम शांततेत, शिस्तबद्ध आणि उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. महापुरुषांच्या विचारांनी प्रेरित होऊन समाजात सकारात्मक बदल घडवण्याचा निर्धार उपस्थितांनी व्यक्त केला.